# सोलापूर महानगरपालिका अग्निशमन विभाग आणि लोकमंगल आय.टी.आय. च्या संयुक्त विद्यमाने भव्य अग्निशमन कार्यशाळा शिबिरा चे आयोजन

सोलापूर :-सोलापूर महानगरपालिका अग्निशमन विभाग आणि श्रीराम ग्रामीण संशोधन आणि विकास प्रतिष्ठान संचालित लोकमंगल औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या विद्यमाने औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये प्रशिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांसाठी एक दिवसीय अग्निशामन शिबिर आयोजित केले होते. या शिबिरा च्या अनुषंगाने विविध प्रकारच्या आगी व त्याची कारणे तसेच विविध प्रकारच्या आगी विझवण्याच्या पद्धती इत्यादी विषयी विद्यार्थ्यांना माहिती देण्यात आली. तसेच अग्निशमन कर्मचाऱ्यांच्या चित्त थरारक कवायतीने आग कशी विझवतात याचे प्रात्यक्षिक ही विद्यार्थ्यांसमोर सादर करण्यात आले. अग्निशमन शिबिराचे यजमानपद सोलापूर महानगरपालिका अग्निशमन विभाग यांच्याकडे होते.

मुख्य अग्निशमन अधिकारी श्री आवटे सर यांच्या मार्गदर्शनाखाली शिबिराचे उद्घाटन करण्यात आले तसेच औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये प्रशिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना विविध प्रकारच्या अग्निशमन संचाबद्दल माहिती देण्यात आली या शिबिरामध्ये प्र.सह.अधीक्षक अच्युत दुधाळ,फायरमन - राजाराम मोरे, तानाजी मंठाळकर,निलेश माने,वाहनचालक - दत्तात्रय दुपारगुडे. यांची उपस्थिती होती, तसेच लोकमंगल औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये प्रशिक्षण घेणाऱ्या 104 विद्यार्थ्यांची शिबिरास उपस्थिती होती.




